जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७९ दिनांक - २९/०१/२०२४**

चंदननगर पो स्टे पुणे शहर

## विश्रांतवाडी, चंदननगर, हडपसर भागांतुन एकत्रीतरीत्या ०७ मोटार सायकली चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास केले जेरबंद

यातील फिर्यादी यांनी दिनांक २३/०१/२०२४ रोजी ते दिनांक २४/०१/२४ रोजीचे दरम्यान त्यांचे मालकीची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटार सायकल आरटीओ नंबर एमएच-२६/अेझेड-०१५२ ही त्यांचे राहते बिल्डींगचे खाली गेट समोर रोडलगत लॉक लावुन पार्क केली असताना, ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करून नेले बाबत चंदननगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने **चंदननगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.४९/२०२४ भादवि कलम ३७९** प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयातील चोरीस गेलेल्या गाडीचा व अज्ञात चोरटयाचा चंदननगर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती.मनिषा पाटील यांचे मार्गदर्शनाखाली तपास करीत असताना, पोलीस अंमलदार,कोद्रे, जाधव यांना नमुद गुन्हयातील मोटार सायकल चोरी करणारा इसम हा चोरीची मोटार सायकल घेवुन शेल पेट्रोल पंप येथे थांबला असल्याची माहिती मिळाली.

त्याअनुशंगाने तपास पथकाचे पोलीस स्टाफने सदर मोटार सायकल चोरीतील इसम **तुकाराम ईश्वर आव्हाळे,वय-२२ वर्षे,रा.जोगेश्वरी हॉटेल,जकात नाका,पुणे नगर रोड,खराडी,पुण,मुळपत्ता-मु.पो.राचन्नावाडी,ता. चाकुर,जि.लातुर** यास लागलीच ताब्यात घेवुन,त्याचेकडे अधिक तपास करता,त्याने नमुद गुन्हयाची कबुली दिल्याने त्याला अटक करून,त्याचे ताब्यात मिळुन आलेली दाखल गुन्हयतील एक स्प्लेंडर प्लस नंबर एमएच-२६/अेझेड-०१५२ ही जप्त करण्यात आली आहे. अटक मुदतीत त्याला विश्वसात घेवुन,अधिक सखोल तपास केला असता, त्याने गेल्या ३-४ महिन्यांपासुन विश्रांतवाडी,चंदननगर व हडपसर परीसरातुन मोटार सायकली चोरी केल्या असल्याचे सांगितले आहे. त्याने सांगितलेप्रमाणे त्याने चोरी केलेल्या गाडया ज्या ठिकाणी लपवुन ठेवल्या होत्या त्याठिकाणी एकुण ०६ मोटार सायकली जप्त करणेत आलेल्या आहेत. त्याचेकडुन एकुण २,३५,०००/- रूपये किंमतीच्या एकुण ०७ मोटार सायकली जप्त करणेत आलेल्या आहेत. सदरचे जप्त मोटार सायकलींचा तपास करताना,१.विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर गुन्हा रजि.नं.३००/२०२३ भादवि कलम ३७९ २.चंदननगर पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि.नं.४७१/२०२३ भादवि कलम ३७९ ३.चंदननगर पोलीस स्टेशन पुणे शहर गुन्हा रजि.नं.५३/२०२४ भादवि कलम ३७९ याप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. इतर ३ चोरीच्या परंतु अभिलेखावर नसलेल्या (बिनधनी) गाडयांचे अनुषंगाने अधिक तपास,तपासी अधिकारी पोउपनिरी.गोरक्ष घोडके हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०४,श्री.विजयकुमार मगर, मा.सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग,पुणे,श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली चंदननगर पो. स्टे कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीमती. मनीषा पाटील, पो.उप.निरीक्षक,गोरक्ष घोडके, तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सहा.पो.निरीक्षक,प्रशांत माने, पो.उप.निरीक्षक,अरविंद कुमरे, पोलीस अंमलदार,अविनाश संकपाळ, सचिन रणदिवे, महेश नाणेकर, दिलावर सय्यद, विष्णु गोणे, श्रीकांत शेंडे, शिवाजी धांडे, संतोष लवटे, नामदेव गडदरे,सुभाष आव्हाड, विकास कदम, शेखर शिंदे, श्रीकांत कोद्रे, सुरज जाधव, गणेश हांडगर, नितीन कांबळे, गजानन पवार यांनी केली आहे.